जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 10-01-2020

**Times of India**

# SUK to hold convocation on Feb 6

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The 56th convocation ceremony of the Shivaji University, Kolhapur (SUK), will be held on the varsity premises on February 6, said Board of Examinations and Evaluation Director G R Palase. A notice issued by the university states that Maharashtra governor and chancellor Bhagat Singh Koshyari will be attending the ceremony. According to the university notice, Koshyari will be heading the function while Dr Bhushan Patwardhan, vice-chairperson University Grants Commission (UGC), will be the chief guest. Varsity officials said further information about the convocation ceremony will be conveyed via newspapers and published on the university website.

A varsity official said that it according to the Maharashtra Public Universities Act, 2016, it is now mandatory to intimate the stakeholders about the convocation ceremony a month before the actual event and that is why the notification was published on January 6. Due to last year's changes in the convocation ceremony under the Maharashtra Universities Act, 2016, the affiliated colleges of SUK were asked to conduct a separate ceremony to distribute the certificates. The same procedure will be followed this year.

The varisty had conferred around 50,000-degree certificates at the 54th convocation ceremony in 2018.

# शिवाजी विद्यापीठात आज दोन पुस्तकांचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरु असलेल्या 'मराठी भाषासंवर्धन पंधरवड्यां'तर्गत आज, शुक्रवारी सकाळी ११ वाजता दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. राजाराम महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख डॉ. रघुनाथ कडाकणे यांचा 'श्वासोच्छ्वासांच्या मध्यंतरातील कविता' व साहित्यिक किरण गुरव यांच्या लोकप्रिय झालेल्या आणि अनेक पुरस्कारप्राप्त अशा 'जुगाड' या कादंबरीची दुसरी आवृत्ती अशा दोन पुस्तकांचे प्रकाशन अविनाश सप्रे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

भौतिकशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमास राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य आण्णासाहेब खेमनर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

# एम.कॉम. परीक्षेबाबत आवाहन

कोल्हापूर : ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१९ मध्ये झालेल्या एम. कॉम. भाग दोन सत्र तीन या अभ्यासक्रमाच्या 'रिसर्च मेथडॉलॉजी अँड प्रोजेक्ट वर्क' या विषयाच्या (केवळ दूरशिक्षण केंद्राकडील) परीक्षेला जे विद्यार्थी बसले आहेत, त्यांची या विषयाची पुन:श्च परीक्षा १८ जानेवारीला होणार आहे. दि. न्यू कॉलेज (कोल्हापूर), कस्तुरबाई वालचंद कॉलेज (सांगली), लाल बहादूर शास्त्री कॉलेज (सातारा) या केंद्रांवर परीक्षा होणार आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून देण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 10-01-2020

तरुण भारत

# विद्यापीठात डिजीटल साक्षरता कार्यशाळा

कोल्हापूर

बँक ऑफ इंडिया अध्यासन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व शाहू ज्येष्ठ नागरिक संघ कोल्हापूर आणि महिला आयोग मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात महिलांकरीता डिजिटल लिटरसी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलसचिव विलास नांदवडेकर यांनी केले. 'ऐटीत रहा, पण सावध रहा" असा संदेश देत डिजिलॉकर, मोबाईल बँकींग, एटीएम वापर याबाबत दक्षता घेण्याचे आवाहन केले.

बँक ऑफ इंडियाचे झोनल मॅनेजर नितीन देशपांडे यांनी डिजिटल लिटरसी ही महत्त्वाची असल्याचे स्पष्ट केले.

या कार्यशाळेत संगणक विभाग प्रमुख स्वाती खराडे, पुणे येथील संध्याताई देशपांडे, आनंद शिंदे, डॉ. विजय ककडे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील २०० महिलांनी सहभाग घेतला. आभार बँक ऑफ इंडियाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी मानले. प्रास्ताविक शाहू ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव श्रीकांत आडीवरेकर यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डिजीटल साक्षरता कार्यशाळाप्रसंगी उपस्थित मान्यवर.

# मराठी विकिपीडियाचे धडे



म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे कागल येथील डी. आर. माने महाविद्यालयात युनिकोड व विकिपीडिया कार्यशाळा घेण्यात आली. विषयातील ज्ञान आणि विश्वसनीय माहिती मराठीतून सर्व समाजाला सहजपणे व मुक्तपणे उपलब्ध व्हावी यासाठी 'मराठी विकिपीडिया' या मुक्त ज्ञानकोशात जास्तीतजास्त नागरिकांनी सतत संपादन करायला हवे, यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि सेंटर फॉर इंटरनेट अँड सोसायटी यांनी पुढाकार घेतला.

मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करण्याच्या हेतूने २०२० यावर्षी इंटरनेटवरील सर्वांत मोठा मुक्त ज्ञानकोश असणाऱ्या 'मराठी विकिपीडिया' मध्ये मराठीतून जास्तीतजास्त ज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त सरकारने सर्व संस्थाना आवाहन केले आहे. याअंतर्गत हा उपक्रम राबवण्यात आला.

## पुस्तक प्रकाशन आज

मराठी भाषा संवर्धन महोत्सवात आज (ता. १०) रोजी सकाळी ११ वाजता दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. रघुनाथ कडाकणे यांचा 'श्वासोच्छवासांच्या मध्यंतरातील कविता' आणि साहित्यिक किरण गुरव यांच्या 'जुगाड' या कादंबरीच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन अविनाश सप्रे यांच्या हस्ते होणार आहे. भौतिकशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमास राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य आण्णासाहेब खेमनर यांची प्रमुख उपस्थिती असेल.

## मराठी विभागातर्फे भाषा पंधरवड्यानिमित आयोजन

या कार्यशाळेत ज्ञानकोशीय नोंदींचे स्वरूप अभ्यासने, तटस्थ, सर्वसमावेशक व संदर्भासहित लेखनाची शैली विकसित करणे, मराठी विकिपीडियाची ओळख करून घेणे, पूर्वी असलेल्या लेखांचे संपादन करणे, नवा लेख लिहिणे, दुवे व संदर्भ देणे, चित्र व प्रतिमा जोडणे याविषयी माहिती देण्यात आली. साठ विद्यार्थी आणि १५ शिक्षक या कार्यशाळेत सहभागी झाले. यावेळी सुबोध कुलकर्णी यांनी विकिपीडियाचे महत्त्व अधोरेखित करून सहभागी विद्यार्थ्यांना विकिपीडियावर खाते उघडून जुन्या नोंदी तपासणे, संपादन करणे आणि नव्या नोंदी लिहिण्याबद्दल मार्गदर्शन केले. यावर्षी शिवाजी विद्यापीठाने कोल्हापूर जिल्ह्याशी संबंधित नोंदी विकिपीडियावर अपलोड करण्याचा प्रकल्प यानिमित्ताने हाती घेतला होता. त्यानुसार सुमारे शंभरहून अधिक नोंदी या कार्यशाळेच्या माध्यमातून विकिपीडियावर नोंदवण्यात आल्या.

प्रारंभी प्रास्ताविक प्रा. संध्या सावंत यांनी केले. पाहुण्यांचा परिचय आणि कार्यशाळेचा उद्देश समन्वयक प्रा. नंदकुमार मोरे यांनी सांगितला. आभार प्रा. नीला जोशी यांनी मानले. यावेळी प्रा. श्रीनिवास पाटील, प्रा. राजेश पाटील, प्रा. संदीप वाडेकर, प्रा. शार्दूल पाटील इत्यादी उपस्थित होते.

# विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अधिविभाग व राज्यशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारपासून दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र व महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे ३७ वे अधिवेशनास सुरुवात होणार आहे.

'राज्यशास्त्रामधील समकालीन समस्या' या मुख्य विषयावर चर्चासत्र व अधिवेशनात चर्चा होणार आहे. सकाळी दहा वाजता खा. संजय मंडलिक यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्‌घाटन होईल. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के राहणार आहेत. संमेलनाध्यक्ष म्हणून डॉ. विलास आवारी उपस्थित राहणार आहेत. मोईन शाकीर, भा. ल. भोळे, अलाहाबाद विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राजन हर्षे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांनी केले आहे.

# सरोजिनी बाबर यांनी स्त्रीला दिले आत्मभान : गवस

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

स्वकर्तृत्व आणि व्यक्तिमत्त्वातून बहुजन स्त्रीला आत्मभान प्रदान करण्याचे कार्य डॉ. सरोजिनी बाबर यांनी केले, असे गौरवोद्‌गार ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण अध्यासन केंद्र व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'सरोजिनी बाबरः कार्य व संशोधन लेखन' या विषयावरील भौतिकशास्त्र सभागृहात एकदिवसीय चर्चासत्रात बीजभाषण करताना डॉ. गवस बोलत होते.

डॉ. गवस म्हणाले, डॉ. बाबर या बहुजन समाजातील कर्तृत्ववान स्त्री तर होत्याच शिवाय लोकज्ञानाचा संचय करणारी कर्तबगार संशोधक आणि गोतावळा जपण्याची वृत्ती असणारी उत्तम माणूसपणा हाही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक अविभाज्य घटक होता.

शेतीच्या अवतीभोवती पडलेल्या ज्ञानाचे संकलन होण्याची कळकळ डॉ. बाबर यांच्या मनी होती. माणूस आणि माती यांचे ऋणानुबंध जपले तरच माणूसपण खऱ्या अर्थाने समृद्ध होईल, अशी त्यांची धारणा होती. त्यातूनच त्यांनी वंचितांच्या प्रश्नांना मिळेल त्या व्यसपीठावर वाचा फोडली. विधिमंडळाच्या माध्यमातून गोरगरीब मुलांच्या



चर्चासत्रात बोलताना डॉ. राजन गवस.

नादारीच्या (ईबीसी) निर्णयामध्ये सरोजिनी आक्कांचा पाठपुरावा महत्त्वाचा ठरला. डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, मराठी भाषेच्या इतिहासामध्ये लोकसाहित्याच्या अनुषंगाने अभ्यास करताना पहिले नमन डॉ. सरोजिनी बाबर यांना करावे लागेल. लोकसाहित्याच्या संशोधक म्हणून त्या जितक्या मोठ्या होत्या, तितक्याच एक सहृदयी व्यक्ती म्हणूनही मोठ्या होत्या. यातून त्यांनी माझ्यासह अनेकांना सातत्याने सहकार्याचा हात दिला. वडील कृष्णराव मास्तरांच्या संस्कारांचा त्यांच्या जडणघडणीत मोठा वाटा राहिला.

अध्यक्षीय भाषणात डॉ. डी.टी. शिर्के म्हणाले, एका व्यक्तीने आपल्या आयुष्यात किती कामे करावीत, याचे प्रत्यंतर डॉ. सरोजिनी बाबर यांच्या जीवनपटाकडे नजर टाकली असता लक्षात येते. स्वातंत्र्य चळवळीपासून ते सर्वस्पर्शी साहित्यनिर्मिती ते राजकारण, समाजकारण असा सार्वत्रिक वावर त्यांचा होता.

यावेळी वैशाली भोसले यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि गृह राज्यमंत्री सतेज पाटील यांच्या शुभसंदेशांचे, तर संजय पाटील यांनी कुमुदिनी पवार यांच्या मनोगताचे वाचन केले. डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. तत्पूर्वी, मान्यवरांच्या हस्ते महर्षी वि. रा. शिंदे, यशवंतराव चव्हाण व सरोजिनी बाबर यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

[illegible]
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 10-01-2020

तरुण भारत

# सरोजिनी बाबर यांचे विविध क्षेत्रात योगदान

## डॉ. राजन गवस यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात एक दिवसीय चर्चासत्र

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्व:कर्तृत्व आणि व्यक्तीमत्त्वातून बहुजन स्त्रीला आत्मभान प्रदान करण्याचे कार्य डॉ. सरोजिनी बाबर यांनी केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासन केंद्र व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'सरोजिनी बाबर: कार्य व संशोधन लेखन' या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. या प्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमास उद्घाटक म्हणून ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार तर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. यावेळी डॉ. बाबर यांच्या भगिनी कुमुदिनी पवार त्यांचे नातू करण पवार प्रमुख उपस्थित होते.

डॉ. सरोजिनी बाबर यांच्या जिवितकार्याचे सर्वंकष महत्त्व अधोरेखित करताना डॉ. गवस म्हणाले, बाबर या बहुजन समाजातील कर्तृत्ववान स्त्री तर होत्याच, शिवाय, लोकज्ञानाचा संचय करणारी कर्तबगार संशोधक आणि गोतावळा जपण्याची वृत्ती असणारी उत्तम माणूसपणा हाही त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा एक अविभिन्न घटक होता. या तिहेरी भूमिकांत वावरत असताना साहित्य, संशोधन, राजकारण, समाजकारण अशा विविध क्षेत्रांत त्यांनी आपले योगदान दिले आणि त्या माध्यमातून समाजाला काही ना काही देण्याचा कसोशीने प्रयत्न केला. मान्यतेला नकार देऊन स्वत:चे अस्तित्व सिद्ध करण्यामध्ये जसे दलित साहित्य यशस्वी झाले, तसेच मान्यतेचे निकष बाजूला ठेवून काम करण्यात सरोजिनी अक्कांचे नाव अग्रेसर आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.



### डॉ. बाबर सहृदयी व्यक्ती

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, मराठी भाषेच्या इतिहासामध्ये लोकसाहित्याच्या अनुषंगाने अभ्यास करताना पहिले नमन डॉ. सरोजिनी बाबर यांना करावे लागेल. लोकसाहित्याच्या संशोधक म्हणून त्या जितक्या मोठ्या होत्या, तितक्याच एक सहृदयी व्यक्ती म्हणून ही मोठ्या होत्या. यातून त्यांनी माझ्यासह अनेकांना सातत्याने सहकार्याचा हात दिला. वडिल कृष्णराव मास्तरांच्या संस्कारांचा त्यांच्या जडणघडणीत मोठा वाटा राहिला

अध्यक्षीय भाषणात डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, एका व्यक्तीने आपल्या आयुष्यात किती कामे करावीत, याचे प्रत्यंतर डॉ. सरोजिनी बाबर यांच्या जीवनपटाकडे नजर टाकली असता लक्षात येते. स्वातंत्र्य चळवळीपासून ते सर्वस्पर्शी साहित्यनिर्मिती ते राजकारण, समाजकारण असा सार्वत्रिक वावर त्यांचा होता. दरवर्षी होणाऱ्या मराठी भाषा पंधरवड्यामध्ये त्यांच्या कार्यावर चिंतन करणारे अशा प्रकारचे सत्र असावे. त्याचप्रमाणे विद्यापीठ उभारत असलेल्या नूतन संग्रहालयामध्ये लोकसाहित्याचे एक दालन असावे आणि त्यात सरोजिनी बाबर यांच्या कार्याचा समावेश असावा, अशा स्वरुपाचा प्रस्ताव अध्यासनामार्फत सादर करावा, अशी सूचनाही त्यांनी या प्रसंगी केली.

डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. मान्यवरांच्या हस्ते महर्षी वि.रा. शिंदे, यशवंतराव चव्हाण व सरोजिनी बाबर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.